

Peer Reviewed Refered
and UGC Listed Journal


ISSN 2279-0489

An International Multidisciplinary
Half Yearly Research Journal

# GENIUS

Volume - VI, Issue - II
February-July- 2018

Impact Factor / Indexing
2017 -4.954
www.sjifactor.com



AJANTA PRAKASHAN

Scanned by CamScanner

# CONTENTS


| Sr. No. | Author Name | Title | Page No. |
|---|---|---|---|
| | **ENGLISH** | | |
| 1 | **Prof. Milind V. Bildikar** | Role of E-Commerce in Indian Corporate Sector | 1-4 |
| 2 | **Pramod Uttamrao Bawaskar** | Role of Librarian in Changing Scenario | 5-8 |
| 3 | **Dr. V. S. Kshirsagar** | Rural Credit in India: Issues and Challenges | 9-13 |
| 4 | **Ghazi Mohammed Zafaruddin**<br>**Dr H. S. Fadewar** | Face Recognition: Challenges and Issues | 14-19 |
| 5 | **Dr. Ravindra Ramdas Shinde** | A Study of Self Esteem and Emotional Maturity among Adolescence | 20-23 |
| 6 | **Dr. Sambhaji Sopanrao Darade** | Buddhist and Culture in India and Thai | 24-28 |
| 7 | **Dr. Mule P. M.** | Effect Tax on Indian of Goods and Service Economy | 29-32 |
| 8 | **Prof. Dr. Ishwar Narayan Jondhale** | Role of NGOS in Rural Development | 33-39 |
| 9 | **Momin Fasiyoddin Inayat** | Mathematics Using Matlab: A New Way of Mathematizing | 40-43 |
| 10 | **Mr. S. D. Mundhe** | Web-Based Library Services: An | 44-49 |




Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 20 | Jadhav V. S. | Indian Constitutional Social Justice & Globalization | 93-95 |
| 21 | Nilesh Sidram Ambewadikar | Third Census of SSI Sector | 96-100 |
| | **MARATHI** | | |
| १ | संजिव शिंदे | ग्रामसेवक : ग्रामीण विकास प्रक्रियेतील भूमिका | १-९ |
| २ | डॉ. सी. एन. कोकाटे<br>प्रा. दिपक पंढरीनाथ सोनटक्के | जिल्हा उद्योग केंद्राच्या सुधारित कर्ज योजनेची अहमदनगर जिल्ह्यातील भूमिका | १०-१३ |
| ३ | व्हि. एस. संबेटवाड | पंडित जवाहरलाल नेहरूंचे समाजवादी विचार | १४-१५ |
| ४ | अर्चना रामरतन रायबोले | संगीतातील अष्टपैलु व्यक्तीमत्व श्री संत गुलाबराव महाराज | १६-२० |
| ५ | श्री. शिवाजी हरी चौगुले | अर्धनारी नटेश्वर मंदिर स्थापत्य वेळापूर | २१-२४ |
| ६ | डॉ. घ. ना. पांचाळ | मौलाना अब्दुल कलाम आझाद यांचे वाचन आणि लेखन | २५-२७ |
| ७ | मिलिंद पंजाब तायडे | महाराष्ट्रामध्ये मनरेगांतर्गत अनुसूचित जातीच्या रोजगाराची स्थिती | २८-३० |
| ८ | सौ. काळे सुप्रिया हेमंतकुमार | कोल्हाटी जमात उगम व वाटचाल | ३१-३५ |
| ९ | प्रा. रामटेके पुरुषोत्तम वारलू | पर्यटन आणि पर्यावरण विशेष संदर्भ: खुलताबाद, वेरुळ, दौलताबाद | ३६-३९ |
| १० | प्रा. शेख जहारा अब्दूल रहीम | भ्रष्टाचार एक समाजाला लागलेला कलंक | ४०-४२ |


Scanned by CamScanner

८

# कोल्हाटी जमात उगम व वाटचाल

**सौ. काळे सुप्रिया हेमंतकुमार**
संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

**प्रस्तावना—**

आज भारत देश जागितिकीकरणाच्या काळात वेगाने वाटचाल करीत असला तरीही विविधतेत एकता हे वैशिष्ट्य जपून आहे. त्यापैकी एक वैशिष्ट्य म्हणजे भारतातील जाती व्यवस्था (Caste System) होय. भारतीय समाज वर्ण व्यवस्था व त्यातून जाती व्यवस्था यांनी निर्माण झालेला दिसतो. समूहात राहणाऱ्या व्यक्तींमध्ये असणारी संबंधांची व्यवस्था म्हणजे समाज. मानव हा समाजप्रिय असला तरीही तो विशिष्ट समुहाशी बांधलेला असतो. दैनंदिन जीवन जगत असताना तो आधार म्हणून समाजाशी किंवा जनसमुदायाशी एकरुप होऊन वागत असतो. परंतु जात, धर्म, लिंग, वंश, वर्ग या संकल्पनांमुळे तो संकुचित व मर्यादित जीवन जगण्याचा प्रयत्न करतो. अशाप्रकारे महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार भटक्या विमुक्त जमातीपैकी कोल्हाटी जमातीची ओळख या शोध निबंधाद्वारे करुन देण्यात येणार आहे.

महाराष्ट्रामध्ये कलावंत म्हणून ओळखली जाणारी कोल्हाटी जमात, तिचा उगम, ऐतिहासिक पार्श्वभूमी, ऐतिहासिक स्थान व वाटचाल स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. तो पुढीलप्रमाणे

महाराष्ट्र शासन परिपत्रक २६ सप्टेंबर २००८ नुसार एकुण ४२ भटक्या विमुक्त जाती व जमाती आहेत.

**१४ विमुक्त जाती—** १. बेरड २. बेस्तर, ३. भामटा, ४.कैकाडी, ५.कंजारभाट,६.कटाबू, ७. बंजारा, ८. राजपारधी, ९. राजपूत, १०. रामोशी, ११. वडार, १२. वाघरी, १३. छप्परबंद, १४. फासेपारधी

**२८ भटक्या जमाती—** १.बेलदार, २. भराडी, ३. भुते, ४. चित्रकथी, ५. गारुडी, ६. घिसाडी, ७. गोल्ला, ८. गोंधळी, ९. गोपाळ, १०. हेळवे, ११. जोशी, १२. काशी कापडी, १३. कोल्हाटी, १४. मैराळ, १५. मसनजोगी, १६. नंदीवाले, १७. पांगूळ, १८. रावळ, १९. सिक्कलगर, २०. ठाकर, २१. वैदू, २२. वासुदेव, २३. भोई, २४. बहुरुपी, २५. ठेलारी, २६. ओतारी, २७. गवळी, २८. दरवेशी

वरीलप्रमाणे कोल्हाटी जमात ही २८ भटक्या जमातीपैकी एक आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये—**

१. कोल्हाटी जमातीची ओळख करुन देणे.

२. कोल्हाटी जमातीचे स्थान व उगम स्पष्ट करणे.

३. कोल्हाटी जमातीचे ऐतिहासीक स्थान स्पष्ट करणे.

४. कोल्हाटी जमातीचे सामाजिक स्थान स्पष्ट करणे.

**संशोधनाची गृहितके—**

१. कोल्हाटी जमातीचे इतिहासातील स्थान महत्वाचे व मोलाचे दिसून येते.

२. कोल्हाटी जमातीचा पारंपारिक व्यवसाय व जातीव्यवस्था यांचा घनिष्ठ संबंध असल्याचे दिसते.



Scanned by CamScanner

**संशोधन पध्दती–**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. तसेच विश्लेषणासाठी दुय्यम स्त्रोताचा आधार घेण्यात आला आहे.

कोल्हाटी जमातीची ओळख करुन घेण्यापूर्वी भटका या शब्दाचा अर्थ जाणून घेणे गरजेचे आहे.

**भटका– शब्दाचा अर्थ व व्याख्या –**

भटक्या जमाती या नावावरुनच अर्थ स्पष्ट होतो. एका जागी स्थिर, स्थायिक नसलेल्या जमातींचा यात समावेश होतो. समाज या घटकात पूर्वीच्या संदर्भानुसार मानव टोळया/समूह करुन राहत असे व उपजिविकेसाठी निश्चित साधन नसल्याने भटक असे. कालांतराने काहींनी निश्चित साधन शोधले व ज्यांना मिळाले नाही ते कायम भटकत व उपेक्षित राहिले.

**अर्थ** – मराठी विश्वकोष खंड–१२ मध्ये भटके याचा अर्थ 'उदरनिर्वाहाकरिता निवडलेल्या अथवा वाटयास आलेल्या व्यावसायानिमित्त अगर उदरनिर्वाहाच्या साधनांच्या शोधार्थ भटकत राहणाऱ्या लोकांना भटके असे म्हणतात'. इंग्रजीत त्यांचा उल्लेख 'नोमॅड्स' असा करतात. नोमॅड हा शब्द नोमी किंवा नेमो (गुरे चारणे) या ग्रीक शब्दापासून तयार झालेला आहे. अशाप्रकारे भटका या शब्दाचा अर्थ स्पष्ट केला आहे.

**संकल्पना व व्याख्या[३]–**

१. ना.धो.कदम २०१३–

नाव सांगायला स्वत:चे गाव नाही, राहायला घर नाही. त्यामुळे उपेक्षित जगणे नशिबी आल्यामुळे पोटासाठी गावोगाव भटकत असलेला आणि भिक्षेवर जगणारा, परंपरागत कलेल्या आधाराने स्वत:ची उपजिविका करणारा लोकसमूह महाराष्टात वेगवेगळया जाती जमातींच्या नावाने जीवन जगताना आढळतो या समूहाला भटके असे म्हणतात.

**२. राठोड मोतीराज–**

भटका हा शब्द छोर या ग्रीक शब्दापासून तयार झाला आहे. त्याचा अर्थ चारणे असा होतो. गवताळ प्रदेशात गुरे–ढोरे पाळणारे चाऱ्याच्या शोधार्थ भटकत असतात. यावरुन भटका म्हणजे एका ठिकाणी न थांबणारा असा होतो.

**३.रामनाथ चव्हाण–**

अत्यंत शुल्लक व्यापाराच्या निमित्ताने गावोगावी भटकत असलेला आणि भिक्षा मागून किंवा काही पारंपारिक कलेच्याआधारे उपजिविका करणारा लोक समूह महाराष्टात वेगवेगळया जाती जमातींच्या नावाने जीवन जगताना आढळतो. अशा या समूहाला भटके विमुक्त असे म्हटले आहे.

भटक्या जमाती संदर्भात टी.बी. खिलारे (२०११) म्हणतात "स्वातंत्र्यपूर्व काळापासून उपजिविकेच्या शोधार्थ भटकी प्रवृत्ती असलेल्या महाराष्टातील जमातीस भटक्या जमाती म्हटले जाते".

**कोल्हाटी शब्द व कोल्हाटी जमातीची ओळख–**

मराठी शब्दकोश खंड २ मध्ये 'कोल्हांट' या शब्दाचा अर्थ हवेतल्या हवेत डोके खाली करुन उडी घेवून पुन्हा पायावर उभे राहणे म्हणजेच शूरपणाचा देखावा असा दिलेला आहे.

"महाराष्ट्रात कोल्हाटी हा समाज कलावंत समाज म्हणून ओळखला जातो. एकेकाळी भटकणारा, नाचगाणे करणारा, कसरतीचे खेळ करुन गावगाडयातल्या लोकांची करमणूक करुन उपजिविका करणारा समाज"[४] अशी रामनाथ चव्हाण यांनी त्यांच्या भटक्या



Scanned by CamScanner

विमुक्तांची जातपंचायत खंड–१ मध्ये ओळख करुन दिली आहे. कोल्हाटी कसरतीचा खेळ, नाच तमाशा करतात. त्यांच्या नायकिणी कसब करतात.[३]

वरिल निर्देशावरुन महाराष्ट्रात कलावंत म्हणून ओळखली जाणारी कोल्हाटी जमात प्राचीन काळापासून नृत्य करणे, कसरतीचे व शूरपणाचे खेळ करणे, जनतेचे मनोरंजन करणे यात निपुण आहे.

**कोल्हाटी जमातीचे स्थान व उगम–**

कोल्हाटी जमातीच्या स्थान व उगमाबाबत विविध अभ्यासकांच्यामतांमध्ये साम्य व भेद दिसून आला आहे. कोल्हाटी अथवा गारुडी यांची १९०१ साली पुरुष १९२२ व स्त्रिया २६८९ ही संख्या डेक्कन, कर्नाटक, कन्नर, कोलाबा, ठाणा या ठिकाणी होती. त्याबरोबर ४६११ हिंदूपैकी १९०१ मध्ये ६८ महंमदमध्ये परतले. कोल्हाटी समाज कर्नाटकमध्ये डोंबारी व अहमदनगर मध्ये खेळकरी म्हणून ओळखला जातो.[४]

R.V. Enthoven (1990) यांनी आपल्या "The Tribes & Caste of Bombay" या ग्रंथात कोल्हाटी जमातीची कर्नाटकमध्ये डोंबारी व अहमदनगर मध्ये खेळकरी अशी ओळख सांगितली आहे.

"अहमदनगर जिल्हयात त्यांना खेळकरी म्हणून संबोधतात तर बेरार प्रांतातील कोल्हाटी बेरीया समाज जो दक्षिणेकडे स्थायीक झाला आहे त्यांची एक शाखा म्हणून मानतात. ते या भागातील रहिवासी म्हणून मानले जातात. महाराष्टात उस्मानाबाद, लातूर, सोलापूर, अहमदनगर या जिल्हयांमध्ये त्यांची वस्ती आहे".[५]

K. S. Singh(2004) यांनी आपल्या "People of India Maharashtra" या ग्रंथात कोल्हाटी समाजाचे स्थान मांडताना महाराष्ट्रातील ४ जिल्हयांचा प्रामुख्याने उल्लेख केलेला दिसतो.

"उत्तर भारतामध्ये मथुरेच्या आसपास कोल्हांटयाप्रमाणे कसरतीचे प्रयोग करुन उपजिविका करणारे लोक आहेत त्यांना 'नट' या नावाने ओळखले जाते".[६]

रामनाथ चव्हाण (२००२) यांनी खंड–१ मध्ये कोल्हाटी जमात ही उत्तर भारतामध्ये 'नट' या नावाने ओळखली जाते असे सांगितले आहे. वरिलप्रमाणेच मराठी विश्वकोष खंड–४ (१९८५) नुसार कोल्हाटी जमातीचे स्थान कर्नाटक व मध्य प्रदेशात आढळल्याचे सांगितले आहे. तसेच महाराष्ट्रात यांना दांडेवाले, कबुतरी, खेळकरी, डोंबारी, कोल्हाटी, बांसबेरिया इ. नावाने ओळखले जाते.

**कोल्हाटी जमातीच्या उपजाती/पोटभेद/कुळे –**

"पश्चिम महाराष्ट्रातील या समाजातील काही लोक या समाजात पोटजाती मानत नाहीत. एवढेच नव्हे तर कोल्हाटी ही एकच जात असून त्यात इतर समाजाप्रमाणे पोटजाती नाहीत असे ते सांगतात. तर विदर्भात राहणारे कोल्हाटी या समाजातील पोटजाती म्हणून गुजराती, डुकरे, पाले, काने, हारके, वले, गोपाळगणी, पोटरे आणि मराठी या पोटजाती सांगतात. त्याच भागात काही ठिकाणी डोंबारी–कोल्हाटी, माळी–कोल्हाटी, भोई–कोल्हाटी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या पोटजाती असल्याचे सांगतात. तर वऱ्हाडात खांब–कोल्हाटी, डुक्कर–कोल्हाटी असेही पोट विभाग असल्याचे सांगण्यात आले. याशिवाय औरंगाबाद व परीसरात गोपाळ–कोल्हाटी, भातू–कोल्हाटी, कबुतर–कोल्हाटी अशाही काही पोट जातींची नावे सांगितली जातात.[७]

रामनाथ चव्हाण (२०००) यांनी आपल्या जाती आणि जमती या ग्रंथात वरीलप्रमाणे कोल्हाटी जमातीच्या पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, वऱ्हाड, औरंगाबाद या प्रांतातील पोटजाती किंवा उपजाती स्पष्ट केल्या आहेत. रामनाथ चव्हाण(२००२) यांनी आपल्या भटक्या



Scanned by CamScanner

विमुक्तांची जातपंचायत खंड–१ मध्ये पुन्हा कोल्हाटी जमातीची प्रमुख बारा कुळे सांगितली आहेत.१. गांगवा, २. काळवा, ३. भोरजा, ४. मुसवात, ५. नय्या, ६. कच्चर, ७. रत्तबा, ८. बिचवा, ९. चंदन, १०. विरपणकर, ११. ब्राम्हणवाले, १२. छडीवाले ही बारा कुळे आहेत.

**कोल्हाटी जमातीचे ऐतिहासिक स्थान – आदर व मानाचे**

प्राचीन भारतात मौर्य वंशाला महत्वाचे स्थान आहे. कोल्हाटी जमातीचे अस्तित्व व पारंपारिक व्यवसाय प्राचीन काळापासून मनोरंजनाचे साधन मानला जात होता. त्यासंबंधीचे विवेचन पुढीलप्रमाणे–

**१.गणिका[८]–**

तत्कालीन समाजात पुरुषांचे मनोरंजन करणारा स्त्रियांचा जो वर्ग होता त्याला गणिका म्हणत. आजच्या वेश्यांपेक्षा गणिका आपल्या नृत्य गायनाने आणि मोठया चार्तुयाने पुरुषांचे मन राखील असत. गणिकांना समाजात मानाचे स्थान असल्याचे दिसते.

**२. गणिकांचे गुप्तहेर म्हणून कार्य[९]–**

त्याकाळात वेश्यांना व्यवसायासाठी परवानगी काढावी लागे. सर्वात सुंदर गणिकेला या व्यवसायाची देखरेख करण्यासाठी नियुक्त केले जात असे. तिला दरमहा पगार दिला जाई. समारंभाप्रसंगी तिला राजदरबारात हजेरी लावावी लागे. सुंदर गणिकांचा उपयोग शत्रू पक्षाकडील माणसे फोडून बातम्या काढण्यासाठी करण्यात येई. समाजात गणिकांना उच्च स्थान होते.

गौतमबुध्दाने बुध्दकालीन प्रसिध्द वारांगना आम्रपाली हिच्या घरी जावून आदरतीथ्य स्विकारल्याचे प्रसिध्द दाखले देता येतील.

जी.बी.शहा (द्वि.आ.२०१३) यांनी मांडलेल्या माहितीनुसार गणिका या गुप्तकालामध्ये नृत्य निपून असून गुप्तहेर म्हणूनही मोलाचे कार्य करीत होत्या. कोल्हाटी जमात ही कलावंत जमात आहे व त्यांचा पारंपारिक व्यवसाय प्राचीन काळात एक महत्वाचे मनोरंजनाचे साधन मानले जात होते. इतिहासामध्ये नृत्य, मनोरंजन, गायन, वादन यांना मानाचे व आदराचे स्थान होते.

कोल्हाटी जमातीचे स्वातंत्र्यपूर्व स्थान आदर व मानाचे असतानाही या नर्तिकेचे रुपांतर नायकिणी मध्ये कसे झाले याची उकल करत असताना जातीसंस्थेचे अर्थशास्त्रीय समर्थनाचा आधार महत्वाचा आहे.

**जातिसंस्थेचे अर्थशास्त्रीय समर्थन[१०]–**

जातिसंस्था ही समाजशास्त्रीयदृष्टया समर्थनीय नाही तर तिचे अर्थव्यवस्थेच्यादृष्टीनेही फायदे होते. एक तर जाती व्यवस्थेत प्रत्येक जातीचे व्यवसाय ठरवून दिलेले असल्याने कोणत्याही व्यक्तिची जीवनवृत्ती ठरविण्याची जबाबदारी व्यक्तिवर येत नाही तसेच एकच व्यवसाय वंशपरंपरेने करीत राहिल्याने तो व्यवसाय करण्याचे पिंडाचे कौशल्य विकसित होत जाते. त्यामुळे कौशल्य मिळविण्यासाठी धावपळ, खर्च वगैरे करण्याची गरज नाही. फक्त एकच जात विशिष्ट व्यवसाय करीत असल्याने स्पर्धा मर्यादित राहात होती. म्हणजेच तीव्र स्पर्धेच्या दोषापासून उदरनिर्वाह सुरक्षित राहात होता. उत्पादकाला बाजारपेठा मिळविण्यासाठी नाना युक्त्या करीत बसावे लागत नव्हते. अन्य जाती हे त्यांच्या उत्पादनाचे गिऱ्हाईक. म्हणजे गिऱ्हाईक निश्चित असल्याने सुरक्षितता किंवा तोटा, भिती नव्हती. गावाला ज्या–ज्या धंदयांची जरुर पडेल ते करणाऱ्या जातींनी गावात राहावे आणि गावाने त्यांना पोसावे असा सरळ, सोपा व्यवहार हिंदूच्या अर्थशास्त्रात आहे. समाज आपले पोषण करतो त्याबदल्यात जात समाजात वस्तू व सेवा पुरविते म्हणून उत्पादन हे नफा नव्हे तर भावनेतून व गरजेतून होत होते. परस्पर पोषण हा अर्थव्यवहाराचा पाया मानला होता. सर्व जातींना त्यांच्या गुणाप्रमाणे व्यवसाय दिले होते. त्यामुळे व्यक्ति आपला व्यवसाय बदलून वर्णांतर करणाऱ्यांचा वंश खंडित होतो असे मानले जात होते.



Scanned by CamScanner

वरील जातिसंस्थेच्या अर्थशास्त्रीय विवेचनावरुन जातिसंस्थेने ठरविलेली चौकट व कोल्हाटी जमातीचा पारंपारिक व्यवसाय यांचा घनिष्ट संबंध असल्याचे दिसते. उदरनिर्वाह, वंशपरंपरा, जातिव्यवस्थेने ठरवून दिलेले नियम यांचा परस्पर संबंध यावरुन लक्षात येतोण

**निष्कर्ष**

१. महाराष्ट्रात कोल्हाटी जमात कलावंत जमात म्हणून ओळखली जाते.

२. उत्तर भारतात या जमातीला नट म्हणून ओळखले जाते.

३. प्राचीन इतिहासात या जमातीचे स्थान आदर व मानाचे होते.

४. कोल्हाटी जमातीचा पारंपारिक व्यवसाय व भारतीय जातिव्यवस्था यांचा घनिष्ट संबंध आहे.

**संदर्भ**

१. आर.जी.दांडगे,'भटक्या विमुक्तांचे प्रश्न व उपाय', सुगावा प्रकाशन, पुण,प्र.आ.२००२, द्वि.आ.ऑगस्ट २०१४, पृ.क्र.१८

२. रामनाथ चव्हाण,'भटक्या विमुक्तांची जातपंचायत खंड–१',देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स,पुणे,५मार्च २००२, पृ.क्र.७१

३. त्रिं.ना.अत्रे, 'गावगाडा', वरदा बुक्स, पुणे प्र.आ.१९१५, तृ.आ.१ जानेवारी १९८९, पुर्नमुद्रण १ जानेवारी १९९५ पृ.क्र.१५

४. R.E.Enthoven, 'The tribes & Castes of Bombay', Asian Education Services, New Delhi, F.P.1922, Re.Print 1990, p.no. 237.

५. K.S.Singh 'People of India Maharashtra', Popular prakashan pvt. Ltd. Mumbai, F.P.2004, p.no.1078.

६. रामनाथ चव्हाण २००२, उ.नि.पृ.क्र.७१

७. तत्रैव, पृ.क्र.८४

८. जी.बी.शहा, 'प्राचीन भारताचा राजकीय आणि सांस्कृतिक इतिहास', प्रशांत प्रकाशन, जळगाव, द्वि.आ.२०१३, पृ.क्र.३०२

९. तत्रैव पृ.क्र.१११

१०. गो.म.जोशी, 'हिंदूचे अर्थशास्त्र भाग पहिला', हिंदू संस्कृती, ग्रंथ संपादक व प्रकाशक मंडळ, नागपूर, १९३७, पृ.क्र. २१९–२३०

Scanned by CamScanner